# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
२५६०१२६४
२५६०१२६५
ई—मेल— pldvp@unipune.ac.in

गणेशखिंड, पुणे ४११००७
नियोजन व विकास विभाग

संदर्भ — साफुपुवि/निववि/1379

दिनांक ३०/९/२०१५

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था.

विषय — वार्षिक अहवाल सन २०१४—१५ साठीची माहिती ऑनलाईन पध्दतीने पाठविणेबाबत. ( दि. १ जुलै २०१४ ते ३० जून २०१५ पर्यंत)

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितास कळविण्यात येते की, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून प्रतिवर्षी वार्षिक अहवाल तयार केला जातो. वार्षिक अहवालासाठी आवश्यक असणारी सन २०१४—१५ ची माहिती या वर्षापासून फक्त ऑनलाईन पध्दतीने पाठविणे अनिवार्य आहे. सदरहू वार्षिक अहवालामध्ये समाविष्ट असलेल्या माहितीचा उपयोग शासन स्तरावर, विविध संस्थांमध्ये केला जातो. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये सदर अहवाल मंजूरीसाठी पाठवावा लागतो व त्यास शासनाची मंजूरी घ्यावी लागते.

वार्षिक अहवालाकरीता आपणाकडून मागविण्यात आलेली माहिती ऑनलाईन पध्दतीने भरली नाही तर शासनाकडून आपणास मिळणारे अनुदान, इतर सवलती देण्याविषयी अडचणी निर्माण होतील. यासंदर्भात मा.व्यवस्थापन परिषदेमध्ये क्र.२४५/१२०९१२ अन्वये असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठ कार्यालयाने वेळोवेळी मागणी केलेली माहिती न देणे ही गंभीर बाब असल्याने यापुढे मागविलेली माहिती वेळेत भरणे अपेक्षित आहे. अन्यथा महाविद्यालयाकडून/संस्थेकडून येणारे संलग्नीकरणाचे, नूतनीकरणाचे किंवा तत्सम प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत.

वार्षिक अहवालाची माहिती सादर करताना ऑनलाईन पध्दतीने भरलेल्या माहितीची एक हार्ड कॉपी नियोजन व विकास विभागास सादर करणे बंधनकारक राहील.

**ऑनलाईन पध्दतीने माहिती सादर करण्याची लिंक खालील प्रमाणे**

unipune.ac.in – Home page - BCUD Online – Login – For College Users – College Login & Password – Annual Report 2014-15

कळावे,

उपकुलसचिव
नियोजन व विकास

प्रत —
मा.संचालक, म.वि.वि.मं., सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे ७